NO. APC-850
DT. 11-09-2002

जा. क्र. मु. अ/औ. मं/डिबो/बैठक/ 5700 /2002
मुख्याधिकारी यांचे कार्यालय,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. दिनांक: 7/9/02

प्रति,
कार्यकारी अभियंता. औरंगाबाद विभाग/लातूर विभाग,
मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ
मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ
मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांचे स्वीय सहाय्यक १
सहाय्यक वास्तुशं: औरंगाबाद मंडळ.
विधी सहाय्यक औरंगाबाद मंडळ.

विषय:- दि. १७-०८-२००२ रोजी झालेल्या १२१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर कार्यवाही करणेबाबत.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. १७-०८-२००२ रोजी झालेल्या १२१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत यासोबत जोडला आहे. सदर कार्यवृत्तांतावर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल त्वरीत सादर करावा.

सोबत: वरीलप्रमाणे.

मुख्य अधिकारी,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. करीता.

9/9

## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

दिनांक १७.८.२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या औरंगाबाद मंडळाच्या १२१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | मा. आ. श्री. कुंडलीकराव नागरे. | .. सभापती, औरंगाबाद मंडळ |
| २] | मा. श्री. के. बी. गवळी. | .. उप-सभापती तथा मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ |
| ३] | मा. श्री. मकरंद सावे. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ४] | मा. श्री. बबनराव देशमुख | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ, |
| ५] | मा. ॲड. श्री. जे. पी. पाटील. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ६] | मा. श्री. चांदपाशा इनामदार. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ७] | मा. डॉ. श्री. डी. डी. शिंदे. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ८] | मा. श्री. साहेबराव खरात. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ९] | मा. श्री. राजेश्वर चव्हाण. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| १०] | मा. श्री. संजय वाघचौरे. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ११] | मा. श्री. वामनराव राऊत. | .. सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| १२] | श्री. डी. पी. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, महानगर पालिका, औरंगाबाद. मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. | .. सदस्य, प्रतिनिधी. |
| १३] | श्री. मो. मुदस्सीर नगर रचनाकार मा. उप-संचालक, नगर रचना यांचे प्रतिनिधी. | .. सदस्य - प्रतिनिधी - |

......

मंडळाच्या १२१ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांचे प्रथम मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत केले. बैठकीच्या कामकाजास सुरुवात होण्यापूर्वी मा. सदस्य श्री. सावे यांनी भारताचे मा. उप राष्ट्रपती कै. श्री. कृष्णाकांत यांचे दु:खद निधन झाल्यामुळे शोक प्रस्ताव मांडला व मंडळाने शोक प्रस्ताव पारीत करुन श्रध्दांजली वाहीली. नंतर मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास पटलावरील विषयास सुरुवात झाली.

विषय क्रं [१] : दि. १४. ६. २००२ रोजी झालेल्या १२० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

दि. १४. ६. २००२ रोजी झालेल्या १२० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करतांना मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी सुचना केली की, औरंगाबाद मंडळास जी जमीन अगोदर ताब्यात मिळेल [ जसे की शासकीय/खाजगी/अन्य जमीन ] ती जमिन प्रथम घेण्याचा विचार करावा व अशा जमिनीवर तात्काळ योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. तसेच एकदा जमीन ताब्यात आल्यानंतर त्यावर योजना राबविण्यासाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करावी. तसेच योजना राबविण्यासाठी सर्व कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर किमान पुढील दोन महिन्यात योजना प्रत्यक्ष सुरु होईल अशा प्रकारची कालमर्यादा संबंधीत अधिका-यावर सोपवावी म्हणजे योजना लवकरात लवकर कार्यान्वीत होतील.

मंडळाचे मा. सदस्य श्री. शिंदे व श्री. देशमुख यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, देवळाई [औरंगाबाद ] व भोकरदन येथे योजना राबविण्यास विलंब होत आहे. याबाबत मुख्य अधिकारी/औरंगाबाद यांनी मंडळास माहिती दिली की, ज्या बाबी मंडळाच्या स्तरावर कार्यवाहीस्तव असतात त्यावर वेळीच कार्यवाही झालेली आहे. परंतु योजना संबंधी काही बाबी ह्या उप-मुख्य अभियंता/प्राधिकरण तसेच शासन स्तरावर निर्णयासाठी जातात अशा वेळी वरिष्ठाचे मान्यतेस विलंब झाल्यास त्या योजनेच्या अंमलबजावणीस विलंब होवु शकतो. या विषयी मा. सभापती यांनी सुचना केली की, औरंगाबाद मंडळाचे प्राधिकरण स्तरावर/उपमुख्य अभियंता स्तरावर निर्णयासाठी जी प्रकरणे जातात त्यावर लवकरात लवकर निर्णय होणे व त्यासही कालमर्यादा असणे अपेक्षित आहे. म्हणजे मंडळाचे प्रकरणे लवकर निकाली निघतील.

मा. सदस्य श्री. वाघचौरे यांनी बैठकीत सांगितले की, तिसगांव येथिल योजनेतील गाळ्यांना सर्व सोयी [पाणी इ. ] उपलब्ध करणेसाठी मंडळाचे अधिका-यांनी कार्यवाही करावी व गाळे लवकरात लवकर वाटप होतील हे पहावे.

मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी ग्रामीण भागात कोणती योजना घेता येऊ शकेल याबाबत विचारणा केली असता मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी माहिती दिली की, म्हाडातर्फे ग्रामीण भागात विशेष गृहनिर्माण योजना म्हणून राष्ट्रीय गृहनिर्माण योजना राबविता येऊ शकेल तर डी. आर. डी. ए. मार्फत " ग्रामीण निवारा योजना " राबविता येईल. त्यामध्ये म्हाडाचा सहभाग फक्त तांत्रीक सहाय्यापुरता आहे. मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी सूचना केली की, मराठवाड्यात ग्रामीण भागात ग्रामीण जनतेसाठी/शेतकऱ्यासाठी किमान १०००० घरे बांधण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा व सदर घरे मुंबई येथे एका एजन्सी मार्फत [ जसे मे. शिर्के मार्फत ] बांधण्यात आली तशाच प्रकारे औरंगाबाद मंडळा अंतर्गत एखाद्या एजन्सीला ग्रामीण भागात घरे बांधणीसाठी काम देता येईल काय याविषयी विचार होणे आवश्यक आहे कारण असे केले तर ग्रामीण निवारा योजने अंतर्गत घरे लवकरात लवकर बांधणे शक्य होईल व ग्राम पातळीवर किमान ५० घरे [ एका गावात ] बांधण्याचा कार्यक्रम हाती घेता येवू शकेल असेही मा. सभापती यांनी सांगितले. ग्रामीण निवारा योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासन स्तरावर सखोल विचार झालेला नाही व सदर योजना ही जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणात कार्यान्वीत होणे आवश्यक होते असे मा. सदस्य श्री. शिंदे यांनी सांगितले. याबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, ग्रामीण निवारा योजने विषयी शासनाला पत्रव्यवहार मंडळाच्या स्तरावर केला होता. परंतु सदर योजना डी. आर. डी. ए. मार्फतच राबवावी व तांत्रिक सल्ला देण्यापर्यन्तच म्हाडाचा सहभाग राहील. असे शासनाने कळविले आहे.

मंडळाचे सदस्य मा. श्री. शिंदे यांनी सांगितले की, ग्रामीण निवारा योजना जलदगतीने राबविणेस्तव डी. आर. डी. ए. अधिकारी व म्हाडाचे अधिकारी यांनी संयुक्तपणे विचार-विनिमय करुन ग्रामीण निवारा योजना राबविण्याचा प्रयत्न करावा.

मा. सर्व सदस्य यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या ताब्यात कोणतीही जमीन आल्याबरोबर अशा जमीनीचे मोजमाप करुन घेणे त्यावर योजना आखणे, त्यातील गाळ्यासाठी मागणी असमाविणे व योजना कार्यान्वीत करणेची जबाबदारी कार्यकारी अभियंता व संबंधीत अधिकारी यांचेवर निश्चित करावी. मा. सभापती यांनी सूचना केली की, मंडळाच्या योजनेसाठी जमिन निवडतांना त्या मोक्याच्या ठिकाणी असाव्यात व त्या गृहनिर्माणासाठी योग्य असाव्यात याची दक्षता अधिकाऱ्यांनी घ्यावी. तसेच जमिनीच्या उपलब्धीतेसाठी मंडळाच्या सदस्यांचेही सहकार्य घ्यावे अशाही सुचना मा. सभापती यांनी केल्या.

मा. सदस्य श्री. देशमुख यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, भोकरदन येथिल मंडळाच्या ताब्यात ~~ब~~ असलेल्या जमिनीवर अतिक्रमण होऊ नये म्हणून तेथे लवकरात लवकर गृहनिर्माण योजना हाती घेण्याची कार्यवाही करावी. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी यांनी सांगितले की, भोकरदन येथिल योजना राबविण्यासाठी निविदा उघडण्यात आल्या असुन पुढिल कार्यवाही चालू आहे.

मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी व तसेच मा. सदस्य श्री. वाघचौरे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंडळाचे जे गाळे विक्री अभावी रिक्त आहेत ते विक्री करण्यासाठी गाळे विक्री एजन्ट ~~अशाचे~~ नेमून त्यांना ठरावीक टक्केवारीचा मोबदला[कमीशन] दिल्यास मंडळाचे गाळे विक्री होण्यास मदत होईल म्हणजेच मंडळाच्या अधिकाऱ्या व्यतिरिक्त इस्टेट एजन्टही प्रयत्न करुन गाळे विक्री करतील. तसेच मंडळास गृहनिर्माण योजनेसाठी मोक्याच्या जमिनी मिळवून देण्यासाठी देखील इस्टेट एजंट नेमता येतिल-काय ही बाब देखील तपासून पाहण्यासाठी मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी यांना सांगितले. मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले की, गाळे विक्रीसाठी कमिशन एजन्ट ठेवणे व जमिन मिळविण्यासाठीही इस्टेट एजन्ट ठेवणे ह्या दोन्ही बाबी तपासून पाहून त्याची माहिती पुढील बैठकीत सादर करण्यांत येईल.

मा. सदस्य डॉ. शिंदे यांनी प्रतिपादन केले की, ~~[illegible]~~ जुने [शहर] औरंगाबाद येथे जमिनी घेण्याची कार्यवाही मंडलाच्या अधिकाऱ्यांनी करावी. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदरील प्रकरणात नगर विकास विभागाकडे पाठपुरावा चालू असून पुन्हा स्मरणपत्र देणेत येईल.

वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर व तसेच दि. १४. ६. २००२ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत मंडळाचे उप अभियंता श्री. पाटील यांनी सविस्तर वाचून दाखविली व सदर कार्यवृत्तांत कायम करण्याबद्दल मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७२० :

दिनांक. १४. ६. २००२ रोजी झालेल्या १२० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते उपरोक्त चर्चेसह कायम करण्यांत आला.

विषय क्रं [२] : गट क्रं १६३ [भाग] बोरी ता. जिंतूर जि. परभणी येथे अत्यल्प उत्पन्न गटातील १३६ गाळ्यांची योजना ..... सदरचे काम विभागून सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदार यांचे मार्फत करुन घेण्यासाठी कामाच्या विभागणीचा प्रस्ताव.

सदर विषयाची बाब टिप्पणी श्री. पाटील उप अभियंता यांनी मंडळास वाचुन दाखविली. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत नमुद केले की, ज्या कामाची किंमत रु १५. ०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे अशी कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना देण्यांत येतात, तथापि, रु १५. ०० लाखा पेक्षा जास्त खर्चाची कामे ही न विभागता अशा कामाचे बाबतीत स्पर्धात्मिक दराचा लाभ मिळण्यासाठी सदर कामे नियमानुसार निविदा पध्दतीने करणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने सदरिल कामे निविदा पध्दतीने करणे योग्य होईल. असे मुख्य अधिकारी यांनी मत व्यक्त केले. तथापि, सदरील प्रकरणात मंडळाच्या दि. २९. ११. २००१ च्या ११५ व्या बैठकीत ठराव क्रं ६९६ च्या अनुषंगाने प्राधिकरणास पाठविलेल्या प्रस्तावाच्या बाबतीत मा. मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी त्यांचे पत्र क्रं प्रा/मु. अ/-२/१०९०/२००२ दि. २४. ७. २००२ अन्वये संदर्भीय कामाची अंदाजीत रक्कम रु ५०. ०० लक्षापेक्षा जास्त असल्यामुळे निविदा स्विकृत करावयाचे अधिकार हे अधिकार प्रदानतेनुसार मंडळास आहेत व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावलीतील परिच्छेद क्रं २१९ नुसार निविदा स्विकृत ~~करण्यास~~ करणाऱ्यास कामाची विभागणी करावयाचे अधिकार असल्यामुळे मंडळाने या बाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा, असे कळविले आहे. त्यावर मंडळाचे मा. सभापती यांनी सदरील काम लवकरात लवकर पुर्ण

करण्याच्या दृष्टोने लातूर येथिल गुमास्ता सहकारो गृहनिर्माण संस्थेचा सभासदासाठो ज्या पध्दतोने सुशिक्षित बेरोजगार अभियंत्या कडून घरे बांधून घेण्यात आलो आहेत त्याच धोर्तिवर बोरो ता. जिंतूर जि. परभणो येथोल प्रस्तावित गाळ्यांचे बांधकाम सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकडून करून घेण्यावो कार्यवाहो करावो. मंडळाचे सदस्य मा. श्रो. शिंदे व मा. श्रो. देशमुख यांनो सांगितले को, मौ. बोरो येथिल योजना हो महाराष्ट्र राज्यातोल ग्रामोण भागात पहिलो योजना आहे व सदर योजना लवकरात लवकर कार्यान्वीत व्हावो यासाठो व एक विशेष बाब म्हणून सदर योजनेतोल कामाचे कार्यकारो अभियंता औरंगाबाद मंडळ यांनो प्रस्तावित केले प्रमाणे विभागणो करून सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकडून करून घेण्यात यावे. यास मंडळाच्या सर्व सदस्यांनो सहमतो दर्शविलो व शेवटो मंडळाने असा निर्णय घेतला को,

ठराव क्रं. ७२१ :

गट क्रं. १६३ [भाग] बोरी ता. जिंतूर जि. परभणो येथे अत्यल्प उत्पन्न गटान्तर्गत १६६ गाळ्याचे बांधकाम मा. मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनो सुचविल्याप्रमाणे व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलोतोल परिच्छेद २१९ नुसार निविदा स्विकार ~~करण्यास~~ करण्याच्या कामावो विभागणो करावयाचे अधिकार असल्याने सदर प्रकरणो निविदा स्विकार करावयाचे अधिकार मंडळास असल्यामुळे बोरो येथोल बांधकाम कार्यकारो अभियंता/औरंगाबाद विभाग यांनो प्रस्तावित केल्याप्रमाणे विभागण्यात यावे व विभागणो करून गाळ्यांचे बांधकाम सुशिक्षित बेरोजगार अभियंत्या मार्फत करून घेण्यात यावे. सदर ठरावाच्या स्थायोकरणावो वाट न पाहता पुढोल कार्यवाहो करावो.

विषय क्रं. [३] : औरंगाबाद येथिल शहर भूमापन क्रमांक २०७२१ वरोल दुकान क्रं. २५ च्या निविदे बाबत.

या विषयावो बाब टिप्पणो मंडळाचे उप अभियंता श्रो. पाटोल यांनो वाचून दाखविलो या विषयो मुख्य अधिकारो, औरंगाबाद मंडळ यांनो माहितो दिलो को, वरिल ठिकाणो

दुकान क्रं. २५ व्यतिरिक्त बाकी सर्व दुकाने वाटप झाली आहेत. दुकान क्रं. २५ साठी देखील श्री. दिलीप वाणी यांनी रु. २७११०१/- ची निविदा भरली आहे. परंतु देकारपत्र देऊनही श्री. वाणी यांनी दुकानाची रक्कम भरली नाही. शेवटी श्री. वाणी यांनी त्यांचे दि. २६. ७. २००२ च्या अर्जान्वये मंडळास कळविले की, त्यांचेकडून दुकान घेण्यासाठी पैशाची तरतुद होत नसल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यांत यावी याच दुकानाचे दुय्यम अधिकतम निविदाधारक हे मराठा सेवा संघ आहेत व त्यांनी निविदेत भरलेली दुकानाची किंमत रु २,१२,५००/- अशी आहे. म्हणून मराठा सेवा संघ जर रु २,७१,१०१/- या दराने दुकान क्रं. २५ घेण्यास तयार झाले तर त्यांना या दराने दुकान देता येईल व नियमाप्रमाणे श्री. वाणी यांची अनामत रक्कम जप्त करुन त्यांची निविदा रद्द करण्यांत येईल.

याबाबत मंडळाचे सदस्य मा. श्री. शिंदे व श्री. वाघचौरे यांनी प्रतिपादन केले की, मंडळाचे पूर्वीचे ३ दुकाने हे सरसकट रु. २, २५, ५००/- या दराने विक्री केलेले आहेत. त्यामुळे मराठा सेवा संघ यांना देखील दुकान क्रं. २५ हे २, २५, ५००/- इतक्या दराने विक्री करण्यांत यावे मा. सभापती यांनी सांगितले की, सर्व दुकाने एकाच दराने म्हणजे रु. २, २५, ५००/- प्रमाणे विक्री झाल्यास ते योग्य ठरेल.

वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने प्रस्तुत विषयावर सर्वानुमते असा निर्णय घेतला की,

ठराव क्रं. ७२२ :

दुकान क्रं. २५ साठीची श्री. दिलीप वाणी यांची निविदा नियमानुसार कारवाई करुन रदद करण्यांत यावी व त्यानंतर दुकान क्रं. २५ दुय्यम अधिकतम निविदाधारक मराठा सेवा संघ यांना सदर दुकान रु. २, २५, ५००/- या दराने विक्री करण्यांत यावे. सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

विषय क्रं. [४] : राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत लातूर येथिल घोषीत झोपडपट्टीतील कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.

वरिल विषयाची बाब टिप्पणी मंडळाचे उप अभियंता श्री. पाटील यांनी वाचुन दाखविली मा. मुख्य अधिकारी यांनी बैठकीत मंडळास माहिती दिली की, सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी लातूर शहरासाठी रु. १११.८० लक्ष रुपयाची तरतुद प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. लातूर नगर परिषदेने झोपडपट्टी सुधार कामान्तर्गत रु. ३२,९५,७९६/- रुपयाची अंदाजपत्रके तयार करुन प्रशासकीय मान्यतेसाठी मंडळाकडे सादर केलेली आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे तपासले असता ३२,९५,७९६/- त्यापैकी रु. ३०,६५,९२९/- एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यास पात्र असल्याबद्दलची माहिती श्री. पाटील उप अभियंता यांनी मंडळास दिली याबाबत मा. सभापती व मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी त्याप्रमाणे रु. ३०,६५,९२९/- एवढया रक्कमेच्या कामांना बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे त्यातील अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी असे चर्चेअंती मंडळाने खालील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेतला की,

ठराव क्रं. ७२३ :

प्रस्तुत विषयाची बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार बाब टिप्पणीत नमुद केलेल्या राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत लातूर येथिल घोषीत झोपडपट्टीतील कामासाठी रु. ३०,६५,९२९/- एवढया रक्कमेची प्रशासकीय मान्यता [बाब टिपणीत नमुद केलेल्या अटीच्या अधिन राहुन ] प्रदान करण्यांत येत आहे. स्थायीकरणाची वाट न पाहता पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

विषय क्रं. ४ [अ] : राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत परभणी येथिल घोषित झोपडपट्टीतील कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत

वरिल विषयाची बाब टिप्पणी मंडळाचे उप अभियंता श्री. पाटील यांनी मंडळास वाचुन दाखविली या विषयाबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, परभणी.

शहरात राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत घोषीत झोपडपट्ट्यात कामासाठी रु. १७.०० लक्षाची तरतुद सन २००२-०३ साठी प्रस्तावित करण्यात आली आहे. परभणी नगर परिषदेकडून परभणी शहरा अंतर्गत झोपडपट्टी सुधार कामासाठी घोषीत झोपडपट्टीत कामे करण्यासाठी रु. ७७,९८,४०३/- एवढ्या रक्कमेची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी मंडळाच्या कार्यालयात प्राप्त झाली आहेत. सादर केलेल्या अंदाजपत्रकापैकी रु. ७६,१६,००५/- एवढी रक्कम शासनाने ठरवून दिल्या निकषाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास पात्र ठरते. प्राधिकरणाच्या परिपत्रकानुसार उपलब्ध तरतुदीच्या दीडपटीपर्यन्तच प्रशासकीय मान्यता प्रदान करता येते व रु. २५.०० लक्ष एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देता येईल अशी माहिती श्री. पाटील उप अभियंता यांनी मंडळास दिली. याबाबत मा. सभापती व मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी असे सांगितले की, प्रतिपूर्ती आर्थिक तरतुदीच्या मर्यादेपर्यन्त असल्यामुळे एकुण पात्र रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास हरकत नाही म्हणून पात्र रक्कम रु. ७६,१६,००५/- एवढ्या रक्कमेच्या बाब टिप्पणीत नमुद केलेल्या घोषीत झोपडपट्टीतील सुधार कामांना बाब टिप्पणीतील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी असा खालील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७२४ :

प्रस्तुत विषयाची बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार बाब टिप्पणीत नमुद केलेल्या राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत परभणी येथिल घोषित झोपडपट्टीतील सुधार कामांसाठी रु. ७६,१६,००५/- एवढ्या रक्कमेस बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

विषय क्रं. (५) : मुकुंदवाडी औरंगाबाद येथिल प्रस्तावित व्यापारी संकुलाच्या आरक्षीत भूखंडास सुरक्षा व्यवस्था प्रदान करणे बाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी उप अभियंता श्री. पाटील यांनी मंडळास वाचुन दाखविली. या विषयी

मा. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, मुकुंदवाडी औरंगाबाद येथे मंडळाच्या व्यापारी संकुलाच्या आरक्षित भूखंडावर ६० फ्लॅटस व १९२ दुकानांची योजना मंडळाने प्रस्तावित करुन त्यासाठी मागणी अंदाज मागविण्यासाठी जाहिरात दिलेली आहे. तथापि, योजना प्रत्यक्ष सुरु करण्यासाठी सर्व कार्यपध्दती पूर्तता करण्यास व योजना सुरु करण्यास बराच कालावधी लागेल व तोपर्यन्त उपरोक्त भुखंडाचे अतिक्रमणापासून संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. सदरील आवश्यकता विचारात घेऊन तत्कालीन मुख्याधिकारी यांनी मे. अजिंठा मेडिपर्टस ॲन्ड सेक्युरिटी सर्व्हिसेस यांचे मार्फत रु. ७७४९/- दरमहा याप्रमाणे सुरक्षा नियुक्तीस दि. २९.७.२००० अन्वये मान्यता देवून त्यास ३१.८.२००२ पर्यन्त वेळोवेळी वाढ दिलेली आहे. त्यात औरंगाबाद मंडळाचे मा. सभापती व मा. सदस्य यांनी सदर सुरक्षितेची आवश्यकता विचारात घेवून कार्योत्तर मान्यता देण्याबाबत तसेच दि. १.९.२००२ ते ३१.३.२००३ पर्यन्त ही सुरक्षा चालु ठेवण्याबाबत त्यांचे खर्चासह सर्वानुमते मान्यता देणेबाबत सहमती दर्शविली तसेच मा. सदस्य श्री. शिंदे व श्री. वाघचौरे यांनी या ठिकाणी प्रस्तावित असलेली योजना ही उत्कृष्ट असल्याचे प्रतिपादन करुन अशा योजना तयार करुन प्रस्तावित केल्या बद्दल त्यांनी मंडळाचे वास्तुतज्ञ श्री. ललित चौधरी व मुख्य अधिकारी श्री. गवळी यांचे कामाची प्रशंसा केली आणि निर्णय घेतला की,

ठराव क्रं. ७२५ :

मुकुंदवाडी [औरंगाबाद] येथिल प्रस्तावित व्यापारी संकुलाच्या आरक्षीत भूखंडास सुरक्षा व्यवस्था २४ तास ठेवण्यासाठी मे. अजिंठा मेडिपर्टस ॲन्ड सेक्युरिटी सर्व्हिसेस यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुरक्षा व्यवस्थेच्या दरमहा रु. ७७४९/- च्या दि. १.८.०२ पर्यन्तच्या कालावधीचे खर्चास कार्योत्तर मान्यता व दि. १.९.२००२ ते ३१.३.२००३ पर्यन्तच्या प्रस्तावीत खर्चास मान्यता सर्वानुमते मान्यता देण्यात येते व उक्त जागेवर प्रस्तावित योजना उत्कृष्ट असल्याबाबत मंडळाचे वास्तुतज्ञ श्री. चौधरी व मुख्य अधिकारी श्री. गवळी यांचे अभिनंदन करण्यात येते.

विषय क्रं. [६] : औरंगाबाद मंडळाचा सन २०००-०१ चा वार्षिक लेखा संमत करणेबाबत.

सदर विषय मंडळाच्या अगामी बैठकीत विचारार्थ व मंजूरीस्तव ठेवण्यांत यावा असे मा. सभापती व मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी बैठकीत सांगितले.

विषय क्रं. [७] : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील रिक्त गाळ्यांच्या विक्रीसाठी केलेले प्रयत्न.

प्रस्तुत विषयाची बाब टिप्पणी मंडळाचे उप अभियंता यांनी मंडळास वाचुन दाखविली. मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळ अंतर्गत रिक्त असलेल्या गाळयांची विक्री करण्यासाठी परिणामकारक प्रयत्न करण्यांत आला व मंडळाचा अडकुन पडलेला निधी मोकळा करण्याचा प्रयत्न करण्यांत आले. औरंगाबाद, परभणी, गेवराई, जालना, तिसगांव, वाळूज, उदगीर इ. ठिकाणी रिक्त असलेले गाळे विक्री करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहेत. तसेच नविन ठिकाणी जसे की, मुरुड, बोरी, सेलू व औरंगाबाद येथिल नविन योजना प्रस्तावित केल्या आहेत व अशा योजनेस ठोस मागणी प्राप्त झाल्यास योजना राबविण्यांत येतिल. मा. सभापती व मा. सदस्य यांनी सांगितले की, मंडळाचे सदस्य व अधिकारी यांनी समन्वय ठेवून रिक्त गाळे विक्री करण्याचा प्रयत्न करावा.

वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मा. सभापती व मंडळाचे सर्व सदस्यांनी प्रस्तुत विषयातील माहिती बाबत नोंद घेतली असे सांगितले व सर्वानुमते निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७२६ :

मंडळा अंतर्गत रिक्त असलेल्या गाळ्यांच्या विक्री करण्याच्या कार्यवाही बद्दल व नविन योजना बाबतच्या माहितीची नोंद घेऊन मंडळा अंतर्गत जे गाळे अद्यापही रिक्त आहेत ते विक्रीसाठी मंडळाचे अधिकारी यांनी मंडळाचे सदस्य यांचे सहकार्य व त्यांचेशी समन्वय साधुन विक्री करण्याचा प्रयत्न करावा.

वरिल प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर ~~मंडळाचे~~ मा. सभापती व मा. सदस्य यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले व त्यावर कार्यवाही करण्यासाठी सुचित केले.

- १२ -

१] मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, औरंगाबाद मंडळा अंतर्गत ग्राम पातळीवर/तालुका पातळीवर व अन्य गृहनिर्माण योजना राबविण्याचे कामे शिघ्रतीने पार पाडण्यासाठी मंडळास अधिकारी/कर्मचारी यांचे जी रिक्त पदे आहेत ते तात्काळ भरण्यासाठी प्राधिकरणास कळविण्यांत यावे. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, रिक्त पदे भरण्यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणास पाठविण्यांत येईल.

२] मंडळाचे सदस्य मा. श्री. शिंदे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, गृहनिर्माण भवनाजवळील शहर भूमापन क्र. २०७१९ [भाग] औरंगाबाद येथिल मोकळ्या व्यापारी संकुलातील कार्यालयासाठी उपयुक्त सदनिकांची जी योजना प्रस्तावित व तयार केली आहे व त्याची विक्री करण्यासाठी निविदा मागविण्यासाठी वर्तमानपत्रातुन जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या आहेत. परंतु या व्यापारी भुखंडावर उपरोक्त योजना राबविण्यापूर्वी सध्या हया भुखंडावर ज्या दोन इमारती बांधल्या आहेत त्या इमारती जुन्या झालेल्या आहेत व हया इमारती पाडून इमारती खालील मोक्याची जागेचा समावेश व्यापारी संकुलात करुन जर योजना राबविली तर मंडळाच्या योजनेस मागणी येवू शकेल व योजनाही सुव्यवस्थित व नियोजनबध्द होईल व एकंदरीत योजनेला " रोड फ्रन्टेज " मिळेल. यासाठी इमारत क्र. १ व २ मध्ये जे दुकानदार आहेत यांची [ इमारती पाडण्यास ] सम्मती घ्यावी लागेल व पर्यायाने दुकानदारांना दुकाने विनामुल्य देण्याचा विचार करावा लागेल व याबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळा समोर माहिती द्यावी. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की सध्या देण्यांत आलेल्या जहिरातीचे बाबतीत जनतेकडून मिळणारा प्रतिसाद विचारात घेवून प्रस्तावित केल्याप्रमाणे सध्या ज्या इमारती आहेत त्या पाडता येतात काय त्या पाडून दुकानदारांना विनामुल्य दुकान देणे फायदेशिर ठरेल काय व यास प्राधिकरण परवानगी देईल काय ? इत्यादीच्या चर्चा बाबत विचार करुन व या बाबतच्या तपशिलाची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

३] मा. सदस्य श्री. खरात यांनी सांगितले की, अंबड येथे एम. आय. डी. सी. कडून जमिन मिळविण्यासाठी व त्यावर योजना राबविण्यासाठी मंडळाचे अधिकाऱ्याने कार्यवाही करावी. याबाबत मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी माहिती दिली की, एम. आय. डी. सी. कडून जमिनीवर गृहनिर्माण योजना राबविण्या-

साठीची परवानगी प्राप्त झाल्यावर अंबड येथे गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी/गाळ्यासाठी मागणी नोंदविण्यासाठी कार्यवाही करण्यांत येईल.

४] मा. सदस्य यांनी बैठकीत सांगितले की, अंबड येथिल शासकीय जमिन [ स. नं. ४०७ ] मधून गृहनिर्माण योजनेसाठी घ्यावयाचा प्रस्ताव तयार करावा. याबाबत कार्यवाही करण्यांत येत असल्याचे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

५] मा. सदस्य श्री. वाघमारे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, जय सहयाद्री सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदासाठी त्याचे घराचे पैसे भरणा करण्याचे मान्य केले असल्यामुळे त्याचे पैसे वसुल करुन घ्यावे व प्रकरणी मागे घ्यावेत. याबाबत मा. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, जय सहयाद्री संस्थे विरुध्द मंडळाने मा. न्यायालयात दाखल केलेली प्रकरणी न्यायप्रविष्ठ आहेत. त्यामुळे या प्रकरणी न्यायालयात प्रलंबीत असलेल्या प्रकरणाविषयी माहिती घेवून त्यानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. कारण न्यायप्रविष्ठ प्रकरणात न्यायालयाचे परवानगीनेच कार्यवाही करता येईल.

६] लातूर येथे झोपडपट्टी सुधार कार्यक्रमान्तर्गत बांधावयाच्या हॉस्पीटलच्या प्रस्तावास मा. सभापती व सर्व सदस्य यांनी सहमती असल्याचे बैठकीत मा. सभापती व सर्व सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले व याबाबत मुख्याधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी. अशा सुचना दिल्या. सदरील प्रकरणात सर्व झोपडपट्ट्यासाठी एकत्रितपणे सुविधा जसे हॉस्पीटल,शाळा घेता येतील किंवा कसे याबाबत शासनाकडून तसेच प्राधिकरणाकडून मार्गदर्शन मागविण्यांत आले असल्याचे मुख्य अधिकारी यांनी सांगितले व ते प्राप्त झाल्या-बरोबर पुढील कार्यवाही करणेत येईल अशी माहिती दिली.

७] मा. सदस्य श्री. इनामदार यांनी बैठकीत प्रतीपादन केले औरंगाबाद मंडळाच्या बैठका महिन्यातून किमान दोन वेळेस घेण्यात याव्यात.

बैठकीच्या समाप्त होते वेळी मंडळाचे मा. सभापती व सर्व मा. सदस्य यांनी मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. के. बी. गवळी यांच्या कामाबद्दल व कामाच्या गती बाबत प्रशंसा करुन समाधान व्यक्त केले व मुख्य अधिकारी यांचे अभिनंदन केले.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

(के. बी. गवळी)
मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ
तथा उप सभापती, औरंगाबाद
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(मा. आ. कुंडलीकराव नागरे)
सभापती,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास
मंडळ, औरंगाबाद.